# विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसकडून निरीक्षक जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्यातील विधानसभा मतदारसंघासाठी निरीक्षक जाहीर केले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार असलेल्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघ आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांचा मतदार संघ असलेल्या पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघासाठी निरीक्षक म्हणून विकास ठाकरे यांच्या समर्थकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा एक भाग म्हणून प्रदेश काँग्रेसने विधानसभानिहाय निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. त्यांची यादी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी प्रसिद्ध केली. यामध्ये दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक म्हणून प्रा. दिनेश बानाबाकोडे आणि पश्चिम नागपूरचे निरीक्षक म्हणून प्रशांत धवड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीत दक्षिण नागपूर आणि मध्य नागपूरमध्ये काँग्रेसने भाजप उमेदवाराला कडवी झुंज दिली होती. आता दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघासाठी राहुल घरडे, मध्य नागपूर अतुल कोटेचा, पूर्व नागपूर राजू देवघरे, उत्तर नागपूरमध्ये औवेरी कादिरी यांना निरीक्षक करण्यात आले आहे.

काटोल विधानसभा मतदारसंघात उदयसिंह ऊर्फ गज्जू यादव, सावनेर मतदारसंघात सचिन किरपान, हिंगणा मतदारसंघात तक्षशीला वागधरे, उमरेड मतदारसंघात अनिल आदमने, कामठी मतदारसंघात बाबा ऊर्फ यशवंत आष्टानकर आणि रामटेक मतदारसंघात ज्ञानेश्वर ऊर्फ नाना कंभाले यांना पक्षाचे निरीक्षक करण्यात आले आहे.

# संदेशखालीमध्ये पुन्हा निदर्शने

## पोलीस महासंचालकांचा दौरा, मानवाधिकार आयोगाकडून चौकशी

**पीटीआय, कोलकाता**

शेख याच्या अटकेच्या मागणीसाठी भाजप नेत्यांनी आंदोलन केले.

**पश्चिम बंगालच्या** उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखालीमध्ये शुक्रवारी सकाळी पुन्हा निदर्शने करण्यात आली. त्यानंतर, राज्याचे पोलीस महासंचालक राजीव कुमार यांनी घटनास्थळी जाऊन त्यांनी दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले.

शुक्रवारी सकाळी संतप्त स्थानिकांनी संदेशखाली येथील तृणमूल काँग्रेसचा नेता शाहजहान शेखच्या मालमत्तेला आग लावली. तसेच तृणमूल काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांच्या घरांचीही जमावाने तोडफोड केली. संदेशखालीच्या बेलमाजूर भागातील एका मासेमारी यार्डाजवळील खळ्याला आंदोलकांनी आग लावली. तृणमूलचा फरार नेता शाहजहान शेख आणि त्याचा भाऊ सिराज यांच्या विरोधात संताप व्यक्त केला. हे खळे सिराजचे असल्याचे समोर आले आहे. कायदा हातात घेणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलीस महासंचालकांनी दिला.

दरम्यान, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या पथकाने संदेशखलीला जाऊन महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या आरोपांबाबत तेथील ग्रामस्थांचे जबाब नोंदवले. राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना नोटीस बजावून संदेशखालीतील हिंसाचाराचा चार आठवड्यांत अहवाल मागवल्याचे आयोगाकडून सांगण्यात आले.

### शेखच्या साथीदारांच्या घरांवर ईडीचे छापे

**फसवणूक करून जमीन हडपण्याच्या एका जुन्या प्रकरणाच्या संदर्भात ईडीने शुक्रवारी तृणमूल काँग्रेसचा फरारी नेता शाहजहान शेख याच्या सहकाऱ्यांच्या घरांवर छापे टाकले. हावडा, विजयगड आणि बिराटीसह पाच ठिकाणी छापे टाकण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.**

# अमेरिकेच्या पहिल्या व्यावसायिक अवकाशयानाचे चंद्रावतरण!

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**अमेरिकेतील एका** खासगी कंपनीने पहिले व्यावसायिक अवकाशयान चंद्रावर उतरवून इतिहास घडवला. तसेच गेल्या ५० वर्षांपेक्षा जास्त काळानंतर अमेरिकेने चंद्रावर प्रथमच खासगी मोहिमेतील बग्गी चालवून अमेरिकेसह भारत, रशिया आणि चीनबरोबर स्थान मिळवले.

'इंट्युटिव्ह मशिन्स' या कंपनीने तयार केलेले 'ओडिसिस' नावाचे हे अवकाशयान गुरुवारी स्थानिक वेळेनुसार सायंकाळी सहा वाजून २३ मिनिटांच्या सुमारास चंद्रावर उतरले. १९७२ मध्ये झालेल्या 'अपोलो १७' मोहिमेनंतर प्रथमच अमेरिकेच्या अवकाशयानाचे चंद्रावतरण झाले आहे.

अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था 'नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन'चे (नासा) प्रशासक बिल नेल्सन यांनी सांगितले की, आज अर्ध्या शतकानंतर प्रथमच अमेरिका चंद्रावर परतली आहे. नेल्सन यांनी सांगितले, की. या 'लँडर'मध्ये 'नासा'ची वैज्ञानिक उपकरणे आहेत.

या उड्डाण मोहिमेचे संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी टिम क्रेन यांनी जाहीर केले की, ''आम्ही निःसंशय खात्रीपूर्वक सांगतो, की आमची उपकरणे चंद्राच्या पृष्ठभागावर सुखरूप उतरली आहेत आणि आम्ही त्यांच्याशी चांगला संपर्क आहे''.

# रशियाचा कल आता आशियाकडे - जयशंकर

**पीटीआय, नवी दिल्ली**

**नवी दिल्ली :** रशियाकडे राज्यशकट चालवण्याची दीर्घ परंपरेची ताकद आहे असे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर शुक्रवारी म्हणाले. हा देश आता आशियाई देशांकडे किंवा बिगर-पाश्चात्त्य देशांकडे वळत असल्याचे निरीक्षणही नोंदवले. एका मुलाखतीत जयशंकर यांनी जागतिक घडामोडी आणि त्यांचे परिणाम याविषयी मत व्यक्त केले.

आशियातील इतर देशांनी आता रशियाबरोबर अधिक संबंध वाढवणे महत्त्वाचे आहे. चीन आणि भारताच्या द्विपक्षीय संबंधांविषयी जयशंकर म्हणाले की, चीन मानसिक डावपेच लढवत आहे. मात्र, सीमावादामुळे चीनने इतर क्षेत्रांतील सहकार्याकडे दुर्लक्ष करता कामा नये असेही ते म्हणाले.

---

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION

### Tender Notice (Offline Tender)

Commissioner NMC invites tenders for the following works. The terms and conditions of tenders and other details are available at the office of under signed and can be purchase from it.

| Sr. No. | Name of Work | Tender Cost (in Rs.) | EMD Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Construction of Cement concrete road & Footpath near Shree Grahit Nagari path Sanstha & other Places in Prabhag No. 29 | 412333/- | 4200/- |
| 2 | Construction of Cement concrete road & Footpath in front of Mhalgi Nagar Primary School & other Places in Prabhag No. 29 | 411729/- | 4200/- |
| 3 | Construction of Approch road for Cement near Mhalgi Nagar Water Tank in Prabhag No. 29 | 411167/- | 4200/- |
| 4 | Construction of Footpath in front of Vatsalaya Play School Pipla Fata & other Places in Prabhag No. 29 | 415289/- | 4200/- |

**NOTE - 1)** Cost of Blank Tender forms (Rs. 590/-) & Class of Contractors :I to VIII **2)** Tender Sale & Submission start date 23.02.2024. **3)** Tender Sale & Submission End date :- 29.02.2024 up to 3.00 pm. **4)** Date of Opening of Tender (if Possible) :- 01.03.2024 at 3.00 pm

**Assistant Commissioner**
**Hanuman Nagar, Zone No. 3, NMC, Nagpur.**

**Advt No. 1091 PR Date 23.02.2024**

P/N/24/1091

---

MAHAGENCO

## Short E-Tender Notice

Online tender is invited in two bids as detailed below.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | EMD / Est. Value In Rs. | Sale Period / Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | T-30 / 3000046022/ 2023-24 | Name of Work :- Repairing maintenance, hiring of air cooler, providing & fixing khas tatties, watering on khas tatties and filling water in air cooler in the O/o Chief Engineer (Civil)-II, Dy. Chief Engineer (Civil), C.C.C., MSPGCL Koradi w.e.f. 15.04.2024 to 14.06.2024. | EMD Rs. 4,300.00<br>----------------<br>Rs. 4,23,382.57 | 24.02.2024 T0 02.03.2024 upto 17.30 hrs.<br>04.03.2024 upto 12.00 hrs. |

***E-Tender Cost will be Rs.1180/-***

1. *For further details pertaining to the above tender is available on website e-procurement. mahagenco.in*
2. *Any amendment to this notice and or notification of amendment in bidding document shall be notified on website e-procurement.mahagenco.in only. Potential bidders are requested to take note of the same.*
3. *Agencies are requested to register themselves for E–Tenders.*

**Note : Vendors are advised to submit the bids well in advance of last date of submission. The E-Tender sale date and submission date will not be extended in any case.**

**Dy. Chief Engineer (Civil),**
**3 x 660 MW, Civil Construction Circle,**
**M.S.P.G.C.L., KORADI**

---

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## e-TENDER NOTICE – 123 / 2023–24

**Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0937 BM1 Refloated | 3000045895 | SUPPLY OF HARD SETTING COMPOUND CEMENT POWDER "CALUNDUM" FOR UNIT NO. 1 TO 4. | 2.94 |
| TN0938 EM1 | 3000045901 | TURBINE AND BOILER SIDE LT MOTOR OVERHAUL OF U#4 DURING CAPITAL OVERHAUL AT 210MW TPS KHAPERKHEDA. | 4.97 |
| TN0939 BM2 | 3000045921 | WORK OF REPLACEMENT OF WATER WALL Z-PANNEL AND WATER WALL SOOT BLOWER PANEL FOR U#05, 500MW, TPS, KHAPERKHEDA. | 31.76 |
| TN0940 BM1 Refloated | 3000045916 | WORK FOR HOT PA FAN, FD FAN & ID FAN MAINTENANCE FOR UNIT NO. 1 TO 4 ON AS & WHEN REQUIRED BAIS. | 19.51 |
| TN0941 TM1 Refloated | 3000045955 | BIANNUAL MAINTENANCE CONTRACT FOR CLEANING OF NOZZLE AND STRAINERS OF COOLING TOWER, UNIT NO. 1 TO 4, KORADI POND AND NAVEGAON. | 21.91 |
| TN0942 BM1 Refloated | 3000045957 | PROCUREMENT OF CARDAN SHAFTS AND COUPINGS FOR COAL MILLS AT UNIT NO. 01 TO 02. | 15.48 |
| TN0943 C&I2 Refloated | 3000045966 | REFILLING AND SUPPLY OF CALIBRATION GASES REQUIRED AT C&I-II, UNIT 5, KHAPERKHEDA TPS. | 1.38 |
| TN0944 AHP1 | 3000045997 | WORK OF RECONDITIONING OF VARIOUS SPARES FOR STAGE -1 PUMP HOUSE AT KHAPARKHEDA TPS. | 31.06 |
| TN0945 CHP1 | 3000045998 | SUPPLY AND INSTALLATION OF MOTORISED ACTUATORS FOR VARIOUS BUNKERING BELT CONVEYORS IN CHP-I (4 X 210MW) TPS KHAPERKHEDA. | 11.50 |
| TN0947 TM1 Refloated | 3000046000 | PROCUREMENT OF SAEL OIL VACUUM PUMP (U#1 TO 4) | 3.76 |
| TN0948 EM1 | 3000046025 | WORK OF LT TRANSFORMER OVERHAULING DURING AOH OF UNIT #2 AT 210 MW TPS KHAPERKHEDA. | 16.50 |
| TN0949 EM1 Refloated | 3000046039 | WORK OF MAINTENANCE OF CHIMENY AVIATION OBSTRUCTION LIGHTING (AOL) SYSTEM AT 210MW TPS KHAPREKHEDA. | 5.98 |
| TN0950 CM1 | 3000046058 | CARRY OUT VARIOUS URGENT CIVIL MAINTENANCE WORKS ALONG BHANEGAON COMPOUND WALL AT 1X500 MW TPS KHAPERKHEDA. | 4.71 |
| TN0951 CHP1 | 3000046073 | BWC FOR DEPLOYMENT OF RETIRED RAILWAY FOREMAN / SHUNTING PERSON FOR INTERNAL YARD POINT OPRATION / WAGON MOVEMENTS ETC.ROUND THE CLOCK FOR THE RAKES FROM SAONER AT TPS KHAPERKHEDA & SHUNTING OPERATIONS AT BHANEGAON TAKE- OFF POINT. | 41.01 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

**Sd /-**
**Chief Engineer (O&M)**
**MSPGCL, TPS Khaperkheda**

---

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

## ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** क्र. 9, एम.पी.नगर, पहिला रस्ता, कोंगू नगर विस्तार, तिरुपूर- 641607.
**कॉर्पोरेट कार्यालयः** कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-400028. **संपर्क क्र. -** 9773406175

**[परिशिष्ट- IV-ए] [नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) ची तरतूद पाहावी]**
**अचल मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना** याद्वारे कर्जदार जय ड्रेसेस (कर्जदार) श्री सुनील दौलतराम आहुजा (प्रोप्रायटर) आणि श्री राजेश गुरुमुखडा पंजवानी (जामीनदार) श्री हरीश धरमदास रघवानी (जामीनदार) यांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेचा सुरक्षित धनको ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून तिची दि. 15.03.2024 रोजी स. 11.00 वाजता (बोली सादरीकरणाचा शेवटचा दिनांक व वेळ आहे 14.03.2024 रोजी सायं. 6.00 वा आहे) ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना वर नमूद कर्जदार व सह-कर्जदार यांचेकडून घेणे असलेल्या दि. 31 ऑगस्ट, 2021 नुसार रु. 46,19,000/- (रुपये शेहेचाळीस लक्ष एकोणवीस हजार फक्त) एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओमकारा पीएस 36/2021-22 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) यांनी दि. 28.09.2021 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये वरील कर्जदार / जामीनदार यांचेविरुद्ध असलेली संपूर्ण थकबाकी कर्जे त्यांमधील अंतर्निहित अनामतींसह दि अकोला अर्बन को-ऑप बँक लि. यांचेकडून अधिग्रहित केली आहेत.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत व ज्ञात बोजे इ. खालीलप्रमाणे आहेतः

| मालमत्तेचे वर्णन | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| मौजे शेपूर येथे स्थित लेआउट प्लॉट, ग्रामपंचायत किन्ही रोकडे, प्र. पो. तू. ता. कारंजा (लाड) जवाहर नगर लेआउट भाग क्र. 01, डहाके पेट्रोल पंपजवळ, कारंजा आणि जि. वाशीम लेआउट प्लॉट क्र. 27, शेत सर्वे क्र. 14/3, एकूण क्षेत्रफळ सुमारे 910 चौ.मी. (9792 चौ.फू.) सोबत तेथील सर्व बांधकाम. वर नमूद प्लॉटच्या चतुःसीमाः पूर्वेस-12 मी. रस्ता, पश्चिमेस- प्लॉट क्र. 32, उत्तरेस - 9 मी. रस्ता, दक्षिणेस- प्लॉट क्र. 26. | रु. 62,00,000/- | रु. 6,20,000/- |

**ई-लिलावाचा दिनांक 15.03.2024 रोजी स. 11.00 ते 2.00 वाजेपर्यंत**

**किमान बोली वृद्धी रक्कम रु. 1,00,000/- (रुपये एक लक्ष फक्त)**

**सहभागासाठी बोली पत्र / केवायसी दस्तावेज / बयाणा रकमेच्या भरण्याचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ - 14.03.2024 रोजी सायं. 6.00 वा.**

**पाहणीचा दिनांक 11.03.2024 रोजी दु. 01.00 ते 04.00 वाजेपर्यंत**

**ज्ञात बोजे ज्ञात नाहीत**

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदारांसाठी असलेली पंधरा दिवसांची सूचनादेखील आहे.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे http://omkaraarc.com/auction.php येथे दिलेली लिंक पाहावी आणि प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175) आणि राजेंद्र देवर्डे 9324546651 आणि ईमेल-pratiksha.patel@omkaraarc.com येथे संपर्क साधावा. बोलीदार वेबसाईटला http://www.bankeauction.com येथे भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा.लि., टेली. हेल्पलाईनः +91-7291981124/25/26, हेल्पलाईन ई-मेल आयडीः support@bankeauctions.com, श्री भाविक पंड्या, मोबाईलः 8866682937, ईमेलः Maharashtra@c1india.com येथे संपर्क साधू शकतात. इच्छुक बोलीदारांनी नादारी व दिवाळखोरी संहिता, 2016 मधील अनुच्छेद 29ए चे पालन करावे आणि आणि त्या अंतर्गत शपथपत्र द्यावे.

**दिनांकः 24.02.2024** **स्वा/-**
**स्थानः कारंजा (वाशीम)** **प्राधिकृत अधिकारी,**
**(प्रतीक्षा पटेल)**
**ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
**(ओमकारा पीएस 36/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)**

---

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION

### Tender Notice

Commissioner NMC invites offline tenders for the following work in Two Envelope System. These Tender can be submitted by the Registered Contractors of Nagpur Municipal Corporation. The terms and conditions of tenders are available at the Office of Executive Engineer Zone No. 05. The sale and purchase of tenders can be done through offline.

| Sr.No. | Name of Work | Tender Cost |
|---|---|---|
| 1 | Painting and Repairing Work at Gurudev Nagar Hanuman mandir Samaj Bhavan in P. No. 27 | 418836 |
| 2 | Repairing Providing and laying CC Pavement at Sakkardara Fire Station NMC in P. No. 30 | 832023 |

**Note : 1)** Tenderer shall have to submit Cost of Blank Tender Form at the Office of Executive Engineer Zone No. 05 and should be submit the copy of these in Technical Bid Document Envelope. **2.** Tender Sale Start : 23.02.2024. **3.** Tender Sales End/Submission End Date:01.03.2024.**4.**Tender opening Date : 04.03.2024.

**Executive Engineer Zone 05**
N.M.C. Nagpur

**Advt No. 1087 PR Date 23.02.2024.**

P/N/24/1087

---

## जना स्मॉल फायनान्स बँक

(शेड्युल्ड कमर्शियल बँक)

**नोंदणीकृत कार्यालयः दि फेअरवे, तळ व पहिला मजला, सर्व्हे क्र. 10/1, 11/2 व 12/2बी, डोमलूरच्या पलीकडे, कोरामंगला रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या शेजारी, चल्लाघट्टा, बंगलोर-560071.**

### खाजगी वाटाघाटीद्वारे विक्रीची सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (सर्फेसी अधिनियम) अंतर्गत बँकेकडे भारग्रस्त असलेल्या अचल मत्तांची विक्री.**

निम्नस्वाक्षरीकार हे जना स्मॉल फायनान्स बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सर्फेसी अधिनियमांतर्गत खालील मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे. **मे. जना स्मॉल फायनान्स बँक लि.** च्या प्राधिकृत अधिकारयांनी सदर मालमत्तेच्या विक्रीसाठी आधीच बरेच जाहीर लिलाव राबविलेले आहेत, परंतु बोली प्राप्त न झाल्याने ते अयशस्वी ठरले आहेत. त्यामुळे, कृपया लक्षात घ्यावे की सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून **पंधरा (15)** दिवसांचे आत वर नमूद कर्ज खात्यामधील एकूण थकबाकी रकमेचा भरणा न केल्यास प्राधिकृत अधिकारी खाली नमूद केल्यानुसार खाजगी वाटाघाटीद्वारे विक्री करतील.

याद्वारे सर्व लोकांना सूचित करण्यात येते की खाली नमूद अनामत मालमत्ता बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे''** तत्त्वावर बँकेस मान्य असलेल्या अटींनुसार विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून मालमत्तेच्या विक्रीसाठी सामान्य अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेतः**

1. खाजगी वाटाघाटीद्वारे विक्री ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.
2. खरेदीदारास मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेने प्रस्ताव स्वीकारल्याच्या दिनांकाच्या दुसरया दिवशी विक्री रकमेच्या 25% एवढ्या रकमेचा भरणा करावा लागेल आणि उर्वरित रकमेचा भरणा त्यानंतर 15 दिवसांचे आत करावा लागेल.
3. खरेदीदारास अर्जासोबत प्रस्ताव रकमेच्या 10% एवढ्या रकमेचा भरणा करावा लागेल आणि ती रक्कम वरील कलम (2) नुसार करण्यात येणारया 25% एवढ्या भरण्यात समायोजित करण्यात येईल.
4. वरील कलम (2) नुसार रकमेचा भरणा न केल्यास अर्जासोबत भरण्यात आलेल्या 10% रकमेसह सर्व रकमा जप्त करण्यात येतील.
5. बँकेने खरेदीचा प्रस्ताव स्वीकार न केल्यास, अर्जासोबत भरणा केलेली 10% रक्कम कोणत्याही व्याजाविना परत करण्यात येईल.
6. खरेदीदाराने (खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून विक्रीर्तगत) सदर मालमत्तेच्या संदर्भात आपले समाधान होईल अशा तरहेने हर प्रकारे समजदारी दाखवावी. खरेदीदारास भविष्यात या संदर्भात प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित कर्जदाराविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही.
7. कुठलेही कारण न देता खरेदीसाठी देण्यात येणारा कोणताही प्रस्ताव फेटाळण्याचा अधिकार बँक राखून ठेवते.
8. एकाहून अधिक प्रस्ताव प्राप्त झाल्यास बँकेद्वारे सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यात येईल.
9. इच्छुकांनी अधिक तपशील / खुलाशासाठी आणि आपला अर्ज सादर करण्यासाठी प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा.
10. मालमत्तेच्या खरेदीच्या संदर्भातील मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आणि इतर खर्च, कर, दर, सोसायटीची थकबाकी इ. चा भरणा खरेदीदारास करावा लागेल.
11. सदर विक्री ही सर्फेसी अधिनियम. नियमांमधील तरतुदींच्या अनुषंगाने करण्यात येईल.

**अनुसूची**

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जदार / सह-कर्जदाराचे नाव | सर्फेसी अधिनियमांतर्गत 13(2) मागणी सूचनेनुसार रक्कम | खाजगी वाटाघाटीसाठी आरक्षित किंमत | अनामत मत्ता/मालमत्ताचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 45749420002289 | **1) श्री अनिल दामोधर ठाकरे, 2) श्रीमती निर्मला अनिलराव ठाकरे, 3) श्री निलेश गोरखनाथ कळमकर, 4) श्रीमती शुभांगी निलेश कळमकर** | 07.02.2023 नुसार रु. 20,98,315.90 (रुपये वीस लक्ष अठ्ठ्याण्णव हजार तीनशे पंधरा आणि नव्वद पैसे फक्त) | रु. 4,00,000/- (रुपये चार लक्ष फक्त) | **मालमत्तेचे वर्णन / अनुसूचीः** बिगर-शेती जमीन असलेला प्लॉट क्र. 16, एकूण क्षेत्रफळ सुमारे 1210.95 चौ.फू. (112.50 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, जुना सर्वे क्र. 4/1, एकूण क्षेत्रफळ सुमारे 16000.0 चौ.मी., मौजा मोंढा, प.ह.न. 49, तहसील हिंगणा, जिल्हा नागपूर. **चतुःसीमाः** पूर्वेस- प्लॉट क्र. 17, पश्चिमेस- प्लॉट क्र. 15, उत्तरेस- 9 मी. रस्ता आणि दक्षिणेस- खसरा क्र. 4/2. |

वर नमूद कर्जदार/ सह-कर्जदारांचे लक्ष सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(8) मधील तरतुदीकडे वेधण्यात येते ज्याअंतर्गत अनामत मत्तेच्या विक्रीच्या दिनांकाअगोदर बँकेस आलेल्या सर्व खर्च, शुल्के, अधिभार इ. सह वर नमूद थकबाकी रकमेचा भरणा केल्यास सदर अनामत मत्ता सोडवून घेतली जाऊ शकते.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः श्री अजय नाईक (मोबा.क्र. 9960948687) आणि ईमेलः Ajay.Naik02@janabank.com आणि श्री महेंद्र ब्राम्हणे (मोबा. क्र. 9029290202), ईमेलः Mahendra.Bramhane@janabank.com. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (पूर्वीची मे. जनलक्ष्मी फायनॅन्शिअल सर्विसेस लि.), शाखा कार्यालय, प्लॉट क्र. 20, तळ मजला, पडोळे हॉस्पिटल समोर, रिंग रोड, दीनदयाल नगर, त्रिमूर्ति नगर, नागपूर-440022.**

**दिनांकः 24.02.2024** **स्वा/- प्राधिकृत अधिकारी,**
**स्थानः नागपूर** **जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

---

**महाराष्ट्र शासन**

## महसूल व वन विभाग

### ''गुणवंत मुलामुलींना कांदळवन व सागरी जैवविविधता या विषयात परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती'' या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अंतर्गत असलेल्या कांदळवन प्रतिष्ठानांतर्गत राज्यातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी Earth and Marine Science या विषयातील THE (Times Higher Education) Ranking ३०० च्या आतील/किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking ३०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा गुणवंत विद्यार्थ्यांकरिता शासन निर्णय क्रमांक एस-१०/२०२२/प्र.क्र.२९५/फ-३ दिनांक : २४ मे २०२३ व १२ जानेवारी २०२४ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या शिष्यवृत्तीसाठी पदव्युत्तर पदवी व पीएचडी यासाठी खालीलप्रमाणे जागा उपलब्ध असतील :-

| अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी | पीएचडी | एकूण |
|---|---|---|---|
| Marine Science, Marine Environmental Science, Marine Policy, Marine Ecology, Mangrove Ecology, Oceanography, Marine Biology, Marine Fisheries, Marine Bio-Technology, Marine Microbiology, Marine Biodiversity, Climate Change and Mangrove Biodiversity/Marine Biology, Carbon Sequestration in Mangroves/Marine Ecosystem, Sea level rise in mangroves, Marine/Coastal Management etc. | १५ | १० | २५ |

**अटी :**

१. विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
२. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परदेशी शैक्षणिक संस्थेचे/विद्यापीठाचे, अद्यावत (सन २०२३-२४) मधील Earth and Marine Science या विषयातील The (Times Higher Education) Ranking ३०० च्या आतील/किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking ३०० च्या आतील असणे बंधनकारक आहे.
३. विद्यार्थ्यांच्या पालकाचे/कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करत असल्यास, त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२२-२३ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये २० लाखांपेक्षा जास्त नसावे.
४. वयोमर्यादा- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची कमाल ३५ वर्षे आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची ४० वर्षे वयोमर्यादा असावी (दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजीचे वय).
५. प्रस्तुत शिष्यवृत्ती सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता लागू राहील. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर विद्यार्थिनींची निवड करण्यात येईल.
६. विद्यार्थ्यांनी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपद्धती इत्यादी माहितीकरिता दिनांक २४.०५.२०२३ व १२.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय (क्रमांक एस-१०/२०२२/प्र.क्र.२९५/फ-३) शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व कांदळवन कक्षाच्या mangroves.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
७. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://mangroves.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अर्ज डाऊनलोड करून भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे (एक पीडीएफ फाइल बनवून) पुढील पडताळणीसाठी दिनांक २८.०३.२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत किंवा त्या आधी पुढील ई-मेल आयडीवर पाठवावी mfnforeignscholarship@gmail.com.
८. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिकची माहिती अथवा अडचणींचे निराकरण करण्यासाठी वर दिलेल्या अधिकृत ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

**पत्ता :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष तथा कार्यकारी संचालक, कांदळवन प्रतिष्ठान यांचे कार्यालय, ३०२, वेकफिल्ड हाऊस, ३ रा मजला, बेलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-४००००१.**